रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये "३६-सहायक अनुदान (वेतन)" या उद्दीष्टाखाली निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक कौविवि-२०२६/प्र.क्र.४२/उद्योजकता**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ मे, २०२६.

**वाचा :** १) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०२०/प्र.क्र.१३/उद्योजकता, दि.३०.०५.२०२२
२) वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९ एप्रिल, २०२६
३) वित्त व लेखा अधिकारी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ यांचे पत्र क्र.रटामराकौवि/निधी/२०२५-२६/सहायक अनुदान वेतन, दि.१३ एप्रिल,२०२६

**प्रस्तावना:**

राज्यातील युवक-युवतींना, एकात्मिक आणि समग्र स्वरुपाचे कौशल्य प्रशिक्षण देण्याकरीता पोषक वातावरणनिर्मिती करण्यासाठी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त कौशल्याधारित उच्च शिक्षणाव्दारे रोजगारक्षम करुन त्यांना रोजगार/ स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ (सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ) दि.२३ मार्च, २०२१ अन्वये राज्यात "रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ" स्थापन करण्यात आले आहे.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ च्या कलम ११ अंतर्गत विद्यापीठाकरिता, "१)कुलगुरु; २)कुलसचिव; ३) कौशल्य विभाग प्रमुख; ४) वित्त व लेखा अधिकारी; ५)विधी अधिकारी; ६) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन; ७) संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम व ८) संचालक, समुपदेशन व पदस्थापना", अशी ८ संविधिक पदांची निर्मिती करण्यात आली आहे.

सदर पदांचे वेतन अदा करण्यासाठी "मागणी क्रमांक झेड ए-०२, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा, (०१)(०५) रतन टाटा कौशल्य विकास विद्यापीठ कार्यक्रम (२२५११०७६) अंतर्गत "३६-सहायक अनुदाने (वेतन)" हे नवीन उपशीर्ष/उद्दिष्ट निर्माण करण्यात आले असून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये "३६-सहायक अनुदान (वेतन)" या उद्दीष्टासाठी रूपये ०७.२० कोटी इतकी

तरतूद करण्यात आली असून त्यापैकी ६० टक्के इतका निधी वित्त विभागामार्फत दिनांक ०९ एप्रिल,२०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे.

दरम्यान रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ च्या कलम ११ अंतर्गत विद्यापीठाकरिता निर्माण करण्यात आलेल्या ८ संविधिक पदांपैकी ज्या पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे, त्या पदांवरील कार्यरत अधिका-यांच्या वेतनासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या, "मागणी क्रमांक झेड ए-०२, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा, (०१)(०५) रतन टाटा कौशल्य विकास विद्यापीठ कार्यक्रम (२२५११०७६) अंतर्गत "३६-सहायक अनुदाने (वेतन)" या उद्दीष्टासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पित रु.०७.२० कोटी इतक्या तरतूदीपैकी बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध असलेल्या निधीपैकी रु.७९,४२,८८४/- (रुपये एकोणऐंशी लाख बेचाळीस हजार आठशे चौऱ्याऐंशी फक्त) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त मंजूर निधी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठास प्रदान करण्यासाठी दि.३०.०५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये आहरण व संवितरण अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तसेच सह/उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर रक्कम एकरक्कमी पध्दतीने विद्यापीठास अदा करण्यात यावी.

३. सदर वितरीत निधीच्या अनुषंगाने होणारा खर्च "झेड ए-०२, २२५१, सचिवालय सामाजिक सेवा, (०१)(०५) कौशल्य विकास विद्यापीठ कार्यक्रम (२२५११०७६) ३६-सहायक अनुदाने (वेतन)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. विद्यापीठास उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी केवळ मंजूर पदांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी खर्च करुन त्यासंबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विद्यापीठाने शासनास सादर करावे.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथील परिपत्रकान्वये प्रशासनिक विभागास प्राप्त अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५०८१२५११५३७९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRANALI PANKAJ GOSAVI YADAV

Digitally signed by PRANALI PANKAJ GOSAVI YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=CF3D0778B0543E10D0A60180DCA4B868819CF9DFE0AF7984474200631642DE70, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=193E87F0B8C5F58941E4D2FBFDB3458DEAB3864A976F06D3984C8149BB888D55, cn=PRANALI PANKAJ GOSAVI YADAV
Date: 2026.05.08 12:57:30 +05'30'

**( प्रणाली गोसावी-यादव )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(आहरण व संवितरण अधिकारी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे मार्फत)

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव (कौ.रो. उ.व ना. विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. कुलगुरु, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, महापालिका मार्ग, मुंबई-०१.
३. कुलसचिव, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, महापालिका मार्ग, मुंबई-०१.
४. उप सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,मंत्रालय, मुंबई.
५. आहरण व संवितरण अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. वित्त व लेखा अधिकारी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एलफिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, महापालिका मार्ग, मुंबई-०१.
७. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
८. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
९. प्रशासन-३, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (उद्योजकता)